MHWR060004132018

दाखल दिनांक – ०१.०२.२०१८
नोंदणी दिनांक – ०१.०२.२०१८
निकाल दिनांक – २२.०७.२०२६
कालावधी – ०८ वर्ष ०५ महिने २१ दिवस

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, हिंगणघाट (न्यायालय क्र.२) यांचे न्यायालयात**
**[पिठासीन अधिकारी – अमोल भा. इंगोले]**

**किरकोळ फौजदारी प्रकरण क्रमांक – १३/२०१८** **नि.क्र.–१३**

**१.** सौ. मनिषा श्यामसुंदर शिंदे,
वय– ३८, धंदा– नोकरी

**२.** रेणुका श्यामसुंदर शिंदे,
वय– ०७, धंदा– शिक्षण
अज्ञान अर्जदार क्र. २ तर्फे अ.पा.क.
आई अर्जदार क्र. १
दोन्ही रा. शासकीय निवास स्थान,
पशुवैद्यकीय दवाखाना, वडनेर, तह. हिंगणघाट
जि. वर्धा **...अर्जदार**

**विरुध्द**

**१.** श्री. श्यामकुमार परसरामजी शिंदे,
वय – ४२ वर्षे, धंदा – नोकरी, ता. हेल्थ ऑफिसर

**२.** रंजिता परसरामजी शिंदे, (अविवाहित)
वय – ३८ वर्षे, धंदा – घरकाम
आरोपी क्र. १ व २ रा. गांधी नगर, पाण्याच्या टाकीजवळ,
आर्णी, ता.आर्णी, जि. यवतमाळ.

**३.** डॉ. सौ. संतोषी दिनेश कामेकर,
वय – ४४ वर्षे, धंदा – नोकरी,

**४.** दिनेश मगनलाल कामेकर,
वय –५० वर्षे, धंदा – नोकरी,
आरोपी क्र. ३ व ४ रा. प्रभारी सहाय्यक जिल्हा कार्यालय,
आरोग्य अधिकारी, ठाणे ...**गैरअर्जदार**

---

**प्रकरण कलम १२, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ च्या प्रमाणे**

---

अर्जदारांतर्फे विद्वान विधीज्ञ – श्री. व्ही. के. राऊतपूरीया,
गैरअर्जदार तर्फे विद्वान विधीज्ञ – श्री. ए.एस. दोड,

---

## न्यायनिर्णय

## (घोषित दिनांक – २२.०७.२०२६)

प्रस्तुतचा अर्ज हा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ च्या कलम १२ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

**अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, –**

**०२.** अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ चा विवाह हा दिनांक १५.०२.२००९ रोजी मौजे वणी, तह. वणी, जि. यवतमाळ येथे झाला. लग्नाचे १ वर्षापूर्वी अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ चे लग्न जुळले तेव्हापासून अर्जदार क्र. १ व अर्जदार क्र. २ चे भ्रमणध्वनीवरून संभाषण व्हायचे. त्या संभाषणा दरम्यान अर्जदार क्र. १ वर गैरअर्जदार क्र. १ हे विनाकारण चिडचिड

करायचे व संशय सुध्दा घ्यायचे. म्हणून अर्जदार क्र. १ व घरच्या लोकांनी गैरअर्जदार क्र. १ शी लग्न न करण्याचे ठरविले व संबंध इथेच संपुष्टात आणण्याचे प्रस्ताव गैरअर्जदार क्र. १ ला दिले. परंतु त्यावेळेस गैरअर्जदार क्र. १ ने स्वतःची चूक मान्य केली.

**०३.** लग्नाच्या वेळेस अर्जदार क्र. १ च्या वडिलांनी गैरअर्जदार क्र. १ ला २ तोळे सोन्याचा गोफ व ५ ग्रॅम सोन्याची अंगठी गैरअर्जदार क्र. १ च्या मागणीप्रमाणे दिली व गैरअर्जदार क्र. १ च्या मागणीप्रमाणे लग्नात ३ तोळ्याचे दागिणेही अर्जदार क्र. १ ला दिले. लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र. १ सोबत आर्णी येथे राहिली व काही दिवसानंतर आपल्या नोकरी साठी नागपूर येथे गेली. नोकरी असल्याने अर्जदार क्र. १ ला दर आठवड्याला आर्णी येथे गैरअर्जदार क्र. १ च्या भेटीला यायची व नागपूर सुध्दा शनिवार, रविवार असल्यास गैरअर्जदार क्र. १ च्या भेटीला यायची. त्यावेळेस तो अर्जदार क्र. १ सोबत नेहमीच भांडण करीत असे. त्याला अर्जदार क्र. १ चे नागपूर येथे राहून नोकरी करणे पसंत नव्हते. तसेच तो अर्जदार क्र. १ च्या चारित्र्यावर सुध्दा संशय घेत होता.

**०४.** अर्जदार क्र. २ चा जन्म नागपूर येथे झाल्यानंतर गैरअर्जदार क्र. १ हे अर्जदार क्र. १ व २ च्या भेटीला आले व त्यांनी अर्जदार क्र. १ सोबत पुन्हा भांडण केले. त्यावेळेस त्याने असे म्हटले की, आता तू तूझ्या माहेरीच राहा. त्यानंतर अर्जदार ही माहेरी राहिली. परंतु मध्यस्थीच्या समजावण्याने अर्जदार क्र. १ पुन्हा आर्णी येथे राहिली व तेथे एक ते दोन महिने राहून पुन्हा नागपूर येथे आली. जेव्हा जेव्हा अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ भेटत होते तेव्हा त्यांच्यामध्ये वाद व्हायचा. सन २०१४ मध्ये गैरअर्जदार क्र. १ ची आई मरण् पावली होती त्यावेळेस ऑक्टोबर २०१४ ते फेब्रुवारी २०१५ पर्यंत अर्जदार क्र.

१ ही नोकरी सोडून गैरअर्जदाराच्या घरी आर्णी येथे राहिली. त्यावेळेस गैरअर्जदार क्र. २ ते ४ हे गैरअर्जदार क्र. १ ला भडकावीत होते. त्यावेळेस तो अर्जदार क्र. १ ला मारत असे.

**०५.** अर्जदार क्र. १ ची नियुक्ती ही पशुधन विकास अधिकारी म्हणून झाली असता ती मिटिंगला वगैरे गेल्यावर तिला गैरअर्जदार क्र. १ हा मारहाण करीत असे. ती क्वॉर्टर मध्ये राहायला गेल्यावर सुध्दा अर्जदार क्र. १ ला शासकीय क्वॉर्टर मिळाल्यानंतर ती एकटी कशी काय राहू शकते या कारणावरून तिला परत मारहाण केली. मार्च २०१६ मध्ये गैरअर्जदार क्र. १ हा वडनेर येथील चिकित्सक कॅम्प मध्ये अर्जदार क्र. १ ला बघून पुन्हा चिडला व तिला शिवीगाळ करून तेथून पुन्हा मारहाण केली.

**०६.** अर्जदार क्र. १ ला गैरअर्जदार याच्या वागणूकीमूळे भयंकर शारिरीक व मानसिक त्रास झाला. त्यामुळे ती वणी येथे राहू लागली. वणी येथे राहत असतांना गैरअर्जदार क्र. १ हा पुन्हा अर्जदार क्र. १ ला तिच्या चारित्र्यावर लांशन लावून मारहाण केली. सन २०१२ मध्ये सुध्दा दहा लाख रूपये आणण्याकरीता तिला मारहाण केली. तसेच २०१७ मध्ये गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदाराचा शारिरीक व मानसिक त्रास दिला. तसेच दि. १२.०३.२०१७ रोजी अर्जदार क्र.१ ने वणी येथे पोलिस स्टेशन येथे तक्रार दाखल केली. तेथे गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ ला नांदवायचे नाही व मला घटस्फोट पाहिजे असे म्हटले. अर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. २ ला हिंगणघाट येथील भवन्स विद्या मंदिर या शाळेमध्ये दाखल केले. परंतु गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार क्र. २ ला परस्पर घेऊन गेला. अर्जदार हिने इतरही शारिरीक व मानसिक छळाचे आरोपी गैरअर्जदार यांचयावर केले आहे. परंतु ते सर्व नमुद करणे आवश्यक वाटत नाही.

**०७.** गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदरांची कोणत्याही प्रकारची उदरनिर्वाह भरणपोषण याची कोणतीही जबाबदारी पार पाडली नाही. त्यामुळे तिला तिच्या आई–वडिलांच्या दयेवर जीवन जगावे लागत आहे. त्यामुळे अर्जदाराने वीस हजार रूपये दरमहा पोटगी मिळावी अशी विनंती केली आहे. तसेच अर्जदार हिने इतरही विनंती सदर प्रकरणामध्ये केली आहे.

**०८.** गैरअर्जदार यांनी त्यांचे लेखी म्हणणे अभिलेखावर न्यायालयाच्या परवानगीने दाखल करणेकरीता अर्ज दाखल केला होता. परंतु तो अर्ज मंजूर होऊन सुध्दा गैरअर्जदार यांनी दंडाची रक्कम न भरल्यामुळे तो अर्ज अभिलेखावर घेण्यात आलेला नाही. तसेच अर्जदार क्र. ३ व ४ यांच्याविरूध्द प्रकरण चालवायचे नाही अशी पुरसीस अर्जदार यांनी नि.क्र. १२ नुसार दाखल केली आहे.

**०९.** अर्जदाराचा अर्ज व पूरावा तसेच अभिलेखावर दाखल केलेल्या दस्तावरून अंतिम न्यायाच्या निर्णयाप्रत येण्यासाठी खालील मुद्यांचा उहापोह होणे गरजेचे आहे. सदरील मुद्दे त्यावरील माझा अनुमान व त्यासाठीची कारणमिमांसा खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार शाबीत करते काय की, गैरअर्जदाराने तिच्यावर घरगुती हिंसाचार केला? | | **होकारार्थी** |
| २. | अर्जदार ही शाबीत करते काय की ती गैरअर्जदार कडुन एकूण रू.२०,०००/– पोटगी मिळण्यास पात्र आहे ? | | **अशंत होकरार्थी,** अर्जदार क्र. २ ही रक्कम रुपये १२००/– दरमहा मिळण्यास पात्र आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | अर्जदार शाबीत करते काय की, ती गैरअर्जदार यांच्या घरात राहण्याचा आदेश मिळणेकरीता किंवा त्या प्रकारचा पर्यायी व्यवस्था करण्याचा आदेश मिळण्यास पात्र आहे का ? | | **नकारार्थी** |
| ४. | अर्जदार शाबीत करते काय की, ती गैरअर्जदार कडुन शारिरीक व मानसिक छळापोटी नुकसान भरपाई म्हणून रक्कम रु.१५,००,०००/– मिळण्यास पात्र आहे? | | **अशंत होकारार्थी,** अर्जदार ही रक्कम रुपये ५,०००/– नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे. |
| ५. | अर्जदार शाबीत करते काय की, ती व तिचे इतर नातेवाईक हे गैरअर्जदार यांनी त्यांच्यावर हिंसाचार करु नये असा आदेश मिळण्यास पात्र आहेत ? | | **नकारार्थी** |
| ६. | अर्जदार शाबीत करते काय की, ती अर्जदार क्र. २ चा ताबा तिच्याकडे ठेवण्यास सक्षम आहे का? | | **नकारार्थी** |
| ७. | आदेश काय? | | **...अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**१०.** अर्जदार हिने तिच्या कथनाच्या पृष्टीप्रित्यर्थ **नि.क्र.–४** नुसार स्वतःच्या पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. तिने कलम १७३ अंतर्गत अंतिम अहवाल नमुनाची प्रमाणीत प्रत नि.क्र.७ वर दाखल केली आहे. तसेच कलम ४९८ अ अंतर्गत वणी येथील न्यायालयात दाखल असलेल्या दोषारोपपत्राची प्रमाणित प्रत नि.क्र. ८ वर दाखल केली आहे. तसेच तिच्या लग्नाची प्रत नि.क्र. ९ दाखल केली आहे. तसेच त्यांनी त्यांचा पुरावा नि.क्र. १० वरील पुरसीस प्रमाणे बंद केला. गैरअर्जदार यांनी त्यांचा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही.

**मुद्दा क्र.१ बाबत –**

**११.** अर्जदार हिने तिच्या पुराव्या प्रतिज्ञालेखामध्ये तिच्या अर्जाचीच

पुनरावृत्ती केली आहे. तिने मुख्यत्वे गैरअर्जदार यांच्यावर असे आरोप केले की, गैरअर्जदार यांनी अर्जदारास शारिरीक व मानसिक त्रास दिला. गैरअर्जदार यांचा उलटतपास झालेला नाही त्यामुळे अर्जदार हिचा पुरावा अआव्हानात्मक राहिला. त्यामुळे तिचा पुरावा पाहता शारीरीक व मानसिक छळ झाला यासंबंधी नाकारण्याजोगी कोणतीही बाब अभिलेखावर आलेली नाही. सदर प्रकरणामध्ये सखोल पुराव्याची आवश्यकता नसून प्रथमदर्शनी पुरावा सुध्दा पूरेसा आहे. तसेच सदर प्रकरण हे सामाजिक स्वरूपाचे असल्यामूळे कोणत्याही स्त्री व तिच्या मुलाचे पालनपोषण व्हावे हा सदर कायद्याचा उद्देश आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करीता</u>**

**१२.** अर्जदार क्र. १ ने असे कथन केले आहे की, गैरअर्जदार हे नोकरीवर असून सुख संपन्नस्थीतीमध्ये आहे. पती असल्याकारणाने अर्जदार क्र. १ हिला पोहचण्याची नैतिक जबाबदारी गैरअर्जदार क्र. १ वर आहे. तसेच अर्जसदार क्र. २ हिचे सुध्दा पालनपोषणाची जबाबदारी वडिल या नात्याने गैरअर्जदार क्र. १ ची आहे. परंतु गैरअर्जदार हे कोणत्या नोकरीवर आहे याबाबत अर्जदार हिने तिच्या अर्जामध्ये काहीही कथन केलेले नाही. त्यामुळे त्यांचे निश्चित उत्पन्न किती आहे याबाबत अभिलेखावर काहीही आलेले नाही. अर्जदार क्र. १ ही स्वतः नोकरीवर असून पशुधन विकास अधिकारी आहे असे तिने तिच्या अर्जामध्ये नमुद केले आहे. त्यामुळे ती स्वतः कमाविती असून तिला तिला गैरअर्जदार यांच्याकडून पोटगी मिळण्याची कुठलीही आवश्यकता नाही. तसेच ती अर्जदार क्र. २ हिचे सुध्दा पालनपोषण करू शकते. परंतु अर्जदार क्र. २ यांच्या पालनपोषणाची संयुक्त जबाबदारी अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ यांची आहे. त्यामुळे मुद्दा क्र.२ चे उत्तर अंशतः होकारार्थी देण्यात येते.

**<u>मुद्दा क्र.३ करीता</u> –**

**१३.** अर्जदार हिने कलम १९ कौटुंबिक हिंसाचारपासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ अन्वये तसेच अर्जदाराने तिला गैरअर्जदार याने त्यांच्या घरात राहण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे किंवा पर्यायी व्यवस्था करावी अशी सुध्दा विनंती केली आहे. परंतु अर्जदार ही स्वतः कमाविती असल्यामुळे ती स्वतःसाठी निवासाची व्यवस्था करू शकते. त्यामुळे ती गैरअर्जदार यांच्या घरात राहण्याची परवानगी मिळावी याकरीता पात्र नाही. तसेच ती त्या प्रकारची पर्यायी व्यवस्था मिळावी यासाठी सुध्दा पात्र नाही. सबब, मुद्दा क्र.३ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र.४ बाबत</u> –**

**१४.** अर्जदार हिने शारिरीक व मानसिक छळापोटी गैरअर्जदारा कडून नुकसान भरपाईपोटी रक्कम रूपये १५,००,०००/– ची मागणी केली आहे. मुद्दा क्र.१ ला दिलेल्या कारणमिमांसावरून कौटुंबिक हिंसाचाराची बाब सिध्द झाल्यामुळे अर्जदार ही नुकसान भरपाई मिळणेस पात्र आहे. परंतु गैरअर्जदाराच्या कमाईचा विचार करता नुकसान भरपाई म्हणून रूपये ५,०००/– देणे योग्य होईल. म्हणून मी मुद्दा क्र.४ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र.५ बाबत</u> –**

**१५.** अर्जदार हिने तिच्या व तिच्या कुटुंबियासोबत गैरअर्जदार यांनी हिंसाचार करु नये म्हणून प्रतिबंधीत करावे अशी विनंती केली आहे. परंतु अर्जदाराच्या पुराव्यावरुन अर्जदार ही माहेरी राहत आहे तेंव्हापासून तिच्यासोबत किंवा तिच्या नातेवाईकांसोबत गैरअर्जदारांनी काही हिंसाचार केला असे दिसत नाही. तसेच ते हिंसाचार करतील अशी शाश्वती अभिलेखावरुन वाटत नाही. त्यामुळे अर्जदार ही त्याबाबतचा आदेश मिळण्यास पात्र नाही. म्हणून मी मुद्दा क्र.५ चे उत्तर

नकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**मुद्दा क्र.६ बाबत –**

**१६.** अर्जदाराच्या कथनावरून असे दिसते की अर्जदार क्र. २ चा ताबा तिच्याकडेच आहे. त्यामुळे त्याबाबत कुठलाही वेगळा आदेश करण्याची आवश्यकता नाही. म्हणून मी मुद्दा क्र.६ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**मुद्दा क्र.७ बाबत –**

**१७.** अर्जदार हिने मुद्दा क्र. १ हा शाबीत करुन तिच्यावर घरगुती हिंसाचार झाला आहे, ही बाब सिध्द केली त्यामुळे गैरअर्जदाराची आर्थिक परिस्थिती व अभिलेखावरील उपलब्ध पुरावा लक्षात घेता मी खालील आदेश पारित करीत आहे –

**आदेश**

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.
२. अर्जदार क्र. १ करीता पोटगी मिळण्याची विनंती नामंजूर करण्यात येते.
३. गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र. २ हिला उदरनिर्वाहाकरीता पोटगी म्हणून दरमहा रु.१,२००/– (रुपये एक हजार दोनशे मात्र) अर्ज दाखल तारखेपासुन दयावे.
४. गैरअर्जदार याने अर्जदार हिस नुकसान भरपाई म्हणुन रु.५,०००/– एकरकमी द्यावे.
५. सदर अर्जापोटी खर्च म्हणून गैरअर्जदाराने अर्जदार हिला रुपये १,५००/– (रुपये एक हजार पाचशे मात्र) द्यावे.

६. सदर न्यायनिर्णयाची प्रत अर्जदार हिला विनामुल्य देण्यात यावी.

(**न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला**.)

AMOL B INGOLE
Digitally signed by AMOL B INGOLE
Date: 2026.07.22 17:49:46 +0530

दिनांकः २२.०७.२०२६

**[अमोल भा. इंगोले]**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२), हिंगणघाट

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per original Judgment".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | B. S. Wani. |
| Court | : | C.J.J.D. & J.M.F.C., Hinganghat. |
| Date | : | 22.07.2026 |
| Judgment signed by presiding Officer on | : | 22.07.2026 |
| Judgment uploaded on | : | 22.07.2026 |